# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.03.2025** **वारः गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1. पायाभूत सुविधा आणि उद्योगांच्या इतकंच प्राधान्य लोकांना, अर्थव्यवस्थेला आणि नवोपक्रमालाही दिल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. पशुधन आरोग्य आणि रोगप्रतिबंधाकरता 3 हजार 880 कोटी रुपये तर केदारनाथ आणि हेमकुंड साहिब रोपवे करता 6 हजार 730 कोटी रुपये खर्चाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजूरी
3. बेकायदेशीररीत्या पाकिस्तानच्या ताब्यात असलेला काश्मीरचा बळकावलेला भाग परत मिळण्याची भारत वाट पाहत असून त्यानंतरच काश्मीर प्रश्न सुटेल.. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचा विश्वास
4. आयएसआयशी संबंध असलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या एका सक्रिय दहशतवाद्याला आज पहाटे उत्तर परदेशातून अटक

आणि

5. आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट सामन्यात न्यूझीलंड अंतिम फेरीत दाखल , भारताविरुद्ध 9 मार्चला अंतिम सामना.

**पंतप्रधान**

सरकारने गुंतवणुकीच्या बाबतीत पायाभूत सुविधा आणि उद्योगांना जितकं प्राधान्य दिलं आहे तितकंच प्राधान्य लोकांना, अर्थव्यवस्थेला आणि नवोपक्रमालाही दिल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. काल व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे 'लोकांमध्ये गुंतवणूक' या विषयावरील अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करताना - लोकांमध्ये गुंतवणुकीचं उद्दीष्ट हे शिक्षण, कौशल्य आणि आरोग्यसेवा या तीन स्तंभांवर उभं असल्याचं मोदी यांनी सांगितलं. टेलिमेडिसिन सुविधेचा सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये विस्तार केला जात असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. राष्ट्राचं भविष्य नवोपक्रमातील गुंतवणुकीद्वारे निश्चित केलं जातं. भारताच्या अर्थव्यवस्थेत अनेक लाख कोटी रुपयांचं योगदान देण्याची क्षमता कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये असून या दिशेने जलद प्रगती करण्याची गरज असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. भारताचं सामाजिक सुरक्षा कवच 24.4 टक्क्यांवरून 48.8 टक्क्यांपर्यंत दुप्पट झाल्याची माहिती केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी या वेबिनारमध्ये दिली. कर्मचारी राज्य विमा महामंडळ अंतर्गत 10 नव्या वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली असून आणखी 10 महाविद्यालये नियोजित आहेत .सरकार भारताला जागतिक नवोपक्रम केंद्र बनवण्यासाठी वचनबद्ध असून 2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात संशोधन, विकास आणि नवोन्मेषासाठी 20 हजार कोटी रुपये मंजूर केल्याची माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी वेबिनारच्या समारोप सत्रात दिली.

**मंत्रीमंडळ**

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत पशुधन आरोग्य आणि रोगप्रतिबंधाकरता 3 हजार 880 कोटी रुपये तर केदारनाथ आणि हेमकुंड साहिब रोपवे करता 6 हजार 730 कोटी रुपये खर्चाला मंजूरी देण्यात आली. सोनप्रयाग ते केदारनाथ या 12.9 किलोमीटर लांबीच्या रोपवे विकासाकरता 4 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाला या बैठकीत मंजूरी देण्यात आल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांना सांगितलं. याबरोबरच 2730 कोटी रुपये खर्चाच्या 12.4 किमी लांबीच्या हेमकुंड साहिब रोपवेची माहितीही वैष्णव यांनी यावेळी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रिमंडळाच्या या निर्णयांचं कौतुक केलं आहे. 2 नवीन रोपवे भाविकांचा वेळ वाचवून प्रवास अधिक सोयीचा करतील तसंच सुधारित पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण कार्यक्रम हे चांगलं पशु-आरोग्य, उच्च-उत्पादकता आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीच्या दिशेनं टाकलेलं मोठं पाऊल ठरेल असं मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही उत्तराखंडच्या 2 रोपवे प्रकल्पांच्या निर्णयाचं कौतुक केलं आहे.

**जयशंकर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन प्रशासन बहुध्रुवीयतेकडे वाटचाल करत असून ते भारताच्या हिताला अनुकूल असल्याचं परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात बदल अपेक्षित होता आणि तो अनेक प्रकारे भारताला अनुकूल आहे. परराष्ट्र मंत्री काल लंडनमधील चॅथम हाऊस थिंक टँकमध्ये 'जगातील भारताचा उदय आणि भूमिका' या विषयावरील चर्चासत्राला संबोधित करत होते. डॉ. जयशंकर सध्या 6 दिवसांच्या यूके आणि आयर्लंड दौऱ्यावर आहेत. काश्मीरमधील समस्या सोडवण्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. जयशंकर यांनी - कलम 370 रद्द करणे हे पहिलं पाऊल होतं, तर काश्मीरमध्ये विकास, आर्थिक उलाढाल आणि सामाजिक न्याय पुनरस्थापित करणे हे दुसरं पाऊल; आणि; मोठ्या संख्येने मतदानासह निवडणुका घेणे हे तिसरं पाऊल होतं असं सांगितलं. बेकायदेशीर रीत्या पाकिस्तानच्या ताब्यात असलेला काश्मीरचा बळकावलेला भाग परत मिळण्याची भारत वाट पाहत असून त्यानंतर काश्मीर प्रश्न सुटेल, असं ते म्हणाले. चीनबद्दल बोलताना, ऑक्टोबर 2024 पासून तिबेटमधील कैलास पर्वत तीर्थयात्रा मार्ग सुरू करण्यासारख्या काही सकारात्मक हालचालींचा उल्लेख डॉ. जयशंकर यांनी यावेळी केला.

**बीकेआय दहशतवादी**

पाकिस्तानच्या आयएसआयशी संबंध असलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) च्या एका सक्रिय दहशतवाद्याला आज पहाटे उत्तर प्रदेश विशेष कृती दल आणि पंजाब पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत उत्तर प्रदेशातल्या कौशांबी जिल्ह्यातून अटक केली आहे. पंजाबमधील अमृतसरमधील रामदास भागातील कुर्लियन गावातील रहिवासी असलेला संशयित दहशतवादी लाजर मसीह बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या जर्मनीस्थित गटाचा प्रमुख स्वर्ण सिंग उर्फ जीवन फौजीसाठी काम करतो आणि तो पाकिस्तानस्थित आयएसआय कार्यकर्त्यांशी थेट संपर्कात आहे. उत्तर प्रदेश पोलिसांनी दहशतवाद्यांकडून तीन जीवंत हातबॉम्ब, दोन जीवंत डेटोनेटर्स, एक परदेशी बनावटीचे पिस्तूल आणि 13 काडतुसं जप्त केली आहेत. हा दहशतवादी गेल्यावर्षी 24 सप्टेंबरला पंजाबमधील न्यायालयीन कोठडीतून पळून गेला होता.

**जपान शिष्टमंडल**

जपान-भारत व्यापार सहकार्य समितीचे अध्यक्ष तात्सुओ यासुनागा यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने काल नवी दिल्ली इथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. 17 सदस्यांच्या या शिष्टमंडळात उत्पादन, बँकिंग, विमान कंपन्या, औषधनिर्माण क्षेत्र, वनस्पती अभियांत्रिकी आणि लॉजिस्टिक्स यासारख्या क्षेत्रांमधील प्रमुख उपस्थित होते. आज नवी दिल्लीत होणाऱ्या जपान-भारत व्यवसाय सहकार्य समितीच्या 48 व्या संयुक्त बैठकीची माहिती यासुनागा यांनी पंतप्रधानांना दिली. भारतातील त्यांच्या विस्तार योजना आणि मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड या त्यांच्या दृढ वचनबद्धतेमुळे आपण उत्साहित झालो आहोत असं मोदी यांनी म्हटलं आहे. या निमित्ताने भारताचा विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदार असलेल्या जपानसोबत आर्थिक सहकार्य अधिक दृढ होण्याची आशा मोदी यांनी व्यक्त केली.

**अमेरिका हमास**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हमासला कडक इशारा दिला असून , गाझामध्ये बंदिवान असलेल्या सर्व ओलिसांची तत्काळ सुटका करण्याची आणि मृतदेह परत करण्याची मागणी केली आहे. व्हाईट हाऊसने दहशतवादी गटाशी थेट वाटाघाटी सुरू असल्याची पुष्टी केल्यानंतर काही तासांतच हा इशारा देण्यात आला. हा इशारा म्हणजे अमेरिकेच्या धोरणात बदल घडवून आणणारं एक पाऊल आहे. त्यांनी इस्रायलला हमासला संपवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व मदत करण्याचं आश्वासन दिलं आहे. तसंच जर ओलिसांची सुटका केली नाही तर हमासचा एकही सदस्य सुरक्षित राहणार नाही असा इशाराही दिला आहे.

**ट्रम्प**

ऑगस्ट 2021 मध्ये काबूल विमानतळावर झालेल्या बॉम्बस्फोटातील एका प्रमुख दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे आणि त्याला अमेरिकेत आणलं जात असल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.. त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील पहिल्या भाषणात बोलताना ट्रम्प यांनी हे पाऊल कट्टरपंथी इस्लामिक दहशतवादाविरुद्ध अमेरिकेच्या नव्या ताकदीचं द्योतक असल्याचं म्हटलं आहे.

**क्रिकेट**

आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला 50 धावांनी हरवून भारताविरुद्ध अंतिम फेरी गाठली. न्यूझीलंडने दिलेल्या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वाधिक 363 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेने निर्धारित 50 षटकांत 9 बाद 312 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने 100 धावा काढल्या, तर रॅसी व्हॅन डर ड्यूसेनने 69 धावा आणि कर्णधार टेम्बा बावुमाने 56 धावा केल्या. न्यूझीलंडकडून कर्णधार मिचेल सँटनरने ३ बळी घेतले तर मॅट हेन्री आणि ग्लेन फिलिप्सने प्रत्येकी 2 बळी घेतले. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत न्यूझीलंडने निर्धारित 50 षटकांत 6 बाद 362 धावा केल्या. रचिन रवींद्रने 101 चेंडूत 108 धावा केल्या, तर केन विल्यमसनने 94 चेंडूत 102 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने 3 आणि कागिसो रबाडाने 2 तसंच वियान मुल्डरने 1 गडी बाद केला. रचिन रवींद्रला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. भारत आणि न्यूझीलंड दरम्यानचा अंतिम सामना रविवारी 9 मार्चला दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.